## रे.मु.नं.२९९/२०१२ मधील नि.क्र.१७ वरील आदेश

***विश्वनाथ पाटील, वगैरे*** ... *वादी*
*विरुध्द*
***रमेश पाटील, वगैरे*** ... *प्रतिवादी*

१. सदरचा अर्ज वादीतर्फे वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील हे मयत झाले असून त्यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे:-

वादीने दावा हा हक्क प्रस्थापनेकरीता व घर मिळकतीचा व जागेचा खुला ताबाकब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरील दाव्यामध्ये वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील हे दि.१७/१२/२०१३ रोजी मयत झाले असून, त्यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज ९० दिवसात देणे वादीवर बंधनकारक होते. परंतु वादीस अनावधानाने वादी क्र. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी ३ वर्षे ४ महिन्यांचा विलंब झाला आहे. तरी न्यायाचे दृष्टीने सदरचा विलंब माफ करुन अर्ज मंजूर करण्याची वादीने मागणी केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे देवून हरकत घेतली आहे. वादीने सदरचा अर्ज हा ब-याच विलंबाने दिला आहे. त्यामुळे वादी क्र. ३ विरुध्द सदरचा दावा अबेट झाला आहे. तसेच वादीने विलंब का झाला याचे संयुक्तिक कारण अर्जात नमूद केलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी मागणी केलेली आहे.

४. वादीने दावा हा हक्क प्रस्थापनेकरीता व घर मिळकत व जागेचा खुला ताबाकब्जा मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी क्र. ३,

चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील यांचे दि.१७/१२/२०१३ रोजी निधन झाले असून, त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे कायदयाने आवश्यक आहे. कायदयानुसार दावा मिळकतीशी संबंधीत सर्व पक्षकारांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे असते. तसेच दाव्याचा गुणदोषावर निकाल करण्याकरीता सर्व पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे असते. वादीस वादी क. ३, चंद्रकांत हरिश्चंद्र पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास ३ वर्षे ४ महिन्यांचा विलंब झाला आहे. तरी, न्यायाच्या दृष्टीने वादी क. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणे योग्य होईल. परंतु, सदर विलंबाचा कालावधी हा बराच असल्यामुळे वादी खर्चास पात्र राहील. कारणे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज (नि.क्र.१७) रक्कम रु.३,०००/- च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २. | खर्चाच्या रक्कमेपैकी रक्कम रु.१,५००/- ही विधी सेवा समिती, उरण यांचेकडे जमा करणेत यावी व उर्वरित रक्कम रु.१,५००/- ही प्रतिवादीस देण्यात यावी. |

उरण. (ए.बी.चव्हाण)
दिनांक : २५/०७/२०१७ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.